## विद्यापीठातील शिक्षण आणि घोटाळे......एक निरिक्षण !

मध्यंतरी एक बातमी वाचनात आली. पुणे विद्यापीठाच्या नकली पदव्या करुन विकणा-या सनातन मॅन्युअल राक्षे या इसमाला अटक. वाचून आश्चर्य वाटलं नाही. कारण हे गुन्हे आता नवीन राहिलेले नाहीत बदलत आहेत ती गुन्हेगारांची नावे - कधी या व्यक्तिचे नाव कधी सचिन नाईक असते तर कधी हेमंत गांगुर्डे. चोरी करताना सापडला तर तो चोर नाहीतर तो सभ्य नागरिक ! उपर्निर्देशित लोकं सापडली म्हणून ती चोर पण भ्रष्टाचाराच्या या भस्मासुराने आपली शिक्षणव्यवस्थाच पोखरुन काढली आहे.

घोटाळ्यांचे प्रकार कोणते ?

विद्यापीठात घोटाळे कोणत्या प्रकारे होतात याच्या वेगळ्या वेगळ्या पध्दति सगळ्यांना माहिती असतात पण त्यावर एकत्रित विचार मात्र कधीच केला गेलेला नाही.

१. पूनर्मूल्यांकनः पुनर्मूल्यांकनात गुण वाढवून घेणं हा एक सर्वत्र माहिती असलेला प्रकार आहे. अनेकजणांचे हात यात पोळले असतात.पण प्रत्येकाला आशा असते ती आपलं काम होण्याचीच. सुरुवातीला सामान्य मध्यमवर्गीय विद्यार्थ्याला वाटायचं की हा शैक्षणिक क्षेत्रात मी किती भारी हे सांगायचा त्या माणसाचा केविलवाणा प्रयत्न आहे पण दुर्दैवाने जेव्हा ही कामं झालेली दिसायला लागली.नापास होउन विषय आला की तो सोडवायला हमखास उपाय म्हणजे पूनर्मूल्यांकन. या प्रकारच्या घोटाळ्यात मात्र कधी कोणी पकडलं गेल्याचं अजूनतरी ऐकिवात तरी नाही. कारण जी मंडळी ही कामं करुन घेतात ती पण गुन्हेगारच असतात त्यामुळे तक्रार नोंदवायच्या फंदात कोणीच पडत नाही.

२. पेपर फुटणेः भविष्य जाणून घ्यायच सोस माणसाला फार पूर्वीपासून आहे. प्रश्न काय येणार आहेत याची उत्सुकता प्रत्येकालाच असते. यातूनच प्रश्नपत्रिका बेकायदेशीरपणे बाहेर पडायचे विविध प्रकार घडताहेत.

- विद्यापीठाकडून महाविद्यालयाकडे पाठवल्या जात असताना परस्पर बाहेर पडणे
- महाविद्यालयात पोचल्यानंतर कार्यालयातून बाहेर पडणे
- प्रश्नपत्रिका तयार करणा-यानेच बाहेर आणणे
- छापखान्यातून बाहेर येणे

३. पेपर दुस-याच कोणीतरी लिहीणेः ही भ्याड लोकांची कृत्यं आहेत. ज्यांना परिक्षेला सामोरं जायची ताकद नसते ती लोकं आपल्याऐवजी दुस-या हुषार विद्यार्थ्याचे छायाचित्र प्रवेशपत्रिकेवर लावतात. आणि मग हा तोतया विद्यार्थी परिक्षा पास होतो व प्रमाणपत्र त्या भ्याड विद्यार्थ्याला मिळते.

४. संगणकात गुणांची नोंद बदलणेः पूनर्मूल्यांकनात अथवा इतरत्र संगणकावर नोंदणी करणा-या माणसाला विकत घेतले जाते आणि मग संगणकावर विद्यार्थ्याचे गुण सहज बदलले जातात. उत्तरपत्रिका हस्तलिखीत, तपासणी मानवीकृत पण निर्णयपत्रिका मात्र संगणकीकृत ही अद्‌भुत घटना आपण साध्य करुन दाखविली.कोणत्याही गोष्टीचा अर्धवट उपयोग हा शेवटी घातकच ठरतो.

५. परिक्षकाला मॅनेज करणेः शिक्षकाकडून गुण वाढवून घेणं हा प्रकार नवीन नाही. पेपर कोणत्या परिक्षकाकडे जातो आहे याचा माग काढत विद्यार्थी येतात आणि विविध अमिषं या परिक्षकांना देतात कधी परिक्षक या अमिषांना बळी पडतातही पण अशा गुन्ह्यांचं प्रमाण फार कमी आहे.

६. उत्तरपत्रिका बदलणेः को-या उत्तरपत्रिका सापडल्याची बातमी मध्यंतरी एका दैनिकात वाचली होती. विद्यापीठाच्या छापील आणि को-या उत्तरपत्रिका गहाळ होणे ही उत्तरपत्रिका बदलली जाणार असल्याची पूर्व सूचना आणि विद्यापीठातल्या मंडळींसाठी असते. विद्यार्थ्याने घरी बसून पेपर लिहीला आणि नंतर तो आणून गठ्ठ्यात ठेवणे ही सध्याची एकदम हीट ट्रीक आहे.

७. नवीन तंत्रज्ञानः छपाईचे नवीननवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. पेपर लिहा, परिक्षकाला पैसे द्या, मग विषय सोडवा ही फारच लांबलचक प्रकरण झालं. इन्स्टंट जमान्यात कधीतरी पदवी मिळवण्याचा इन्स्टंट प्रकार येणारच होता. त्यामुळे आता पाच हजारात तुम्हाला पाहिजे त्या विद्यापीठाची पाहिजे ती प्रमाणपत्रे छापून मिळतात. संगणकाची कमाल दुसरं काय ? लोकं म्हणे या पदव्या घेउन परदेशात गेले आहेत. परिक्षेच्या निर्धारित वेळेव्यतिरिक्त परिक्षास्थानकावर अथवा इतरत्र पेपर लिहीले जाणे किंवा पुढच्या-मागच्या विद्यार्थ्याचे बघून उत्तर लिहीणे, परिक्षास्थानावर उत्तर लिहीलेली कागदपत्रं बाळगणे या वेगळ्याच समस्या आहेत.
८. लेखाविषयक घोटाळेः बातमी २८ मार्चची ! पूणे विद्यापीठाने निवीदा न मागवताच खरेदी केल्याची. कोणी म्हणतं या निव्वळ हिशेब राखण्यातल्या चुका आहेत तर कोणी म्हणतं हा गैरव्यवहार आहे. लेखापुस्तके लिहीण्याबाबत काही नियम असतात. हे नियम सर्रासपणे धाब्यावर बसवले जातात. वैयक्तिक फायद्यासाठीच.

## आकडेवारी

युजीसीकडे २३४ नोंदणी झालेल्या विद्यापीठांमध्ये भारतात दरवर्षी साधारण ७०.८० लाख विद्यार्थी उच्च शिक्षण घेतात. एकट्या महाराष्ट्रात २७ विद्यापीठे आहेत. १२६०० उच्चशिक्षण देणा-या संस्था आहेत. या वर्षी नियोजित व अनियोजित कामासाठी १०२० कोटी रुपये अनुदानाव्दारे दिले जातात.३३१००० शिक्षक जनतेला उच्चशिक्षीत करण्याच्या कामात व्यस्त आहेत. तरीही या क्षेत्राचा म्हणावा तसा विकास अजून होताना दिसत नाही आहे. युजीसीचे नियम हे फक्त विद्यापीठांना मिळणा-या अनुदानापुरता मर्यादित असतात. महाराष्ट्राचे राज्यपाल हेच सगळ्या विद्यापीठांचे कुलपति असतात.

## लेखापरिक्षण

लेखापरिक्षक मग ते वैधानिक असोत किंवा अंतर्गत ते परिक्षणाबाबत उदासिनच असतात. कारण कोणत्याही लेखापरिक्षकांवर चुकीचा अवहाल देण्याची जबाबदारी नाही. कंपन्यांच्या लेखापरिक्षकांना भागधारकाचं, देणेक-यांचं हित लक्षात घ्यावं लागतं तसं विद्यापीठांच्या लेखापरिक्षकांसाठी वैधानिक अवहाल देणे ही निव्वळ औपचारिकता असते.

## मानसिकता विद्यार्थ्यांची

मुंबई विद्यापीठाचे पहिले कुलपति सर विलेड यांनी विद्यापीठाच्या पहिल्या पदवीदान समारंभात सांगितलं होतं की विद्यापीठाचं शिक्षण हे तुमच्या मातृभाषेच्या विकासासाठी आणि देशबांधवांच्या उन्नतिसाठी दिलेले एक निधान आहे. पण ही मानसिकता लोप पाउन आता बरीच वर्ष लोटली आहेत.आता शिक्षण ही पल्ल्याड जाण्यासाठी औपचारिकता मात्र राहिली आहे. संगणकातल्या क्रांतिमुळे माणसाच्या हातात बक्कळ पैसा पडायला लागला आहे त्यामुळे विद्यार्थी ही पाचपन्नास हजारांची रिस्क घ्यायला तयार आहेत. विद्यार्थ्यांचं वर्ष वाचणं हे सगळ्यात महत्वाचं असतं

## गैरप्रकारकारांची मानसिकता

नोटांच्या गड्ड्या खुणवायला लागल्या की माणूस गैरव्यवहारांकडे वळतो. आणि हे गैरप्रकार तर इतके सुरक्षित आहेत की इथे कोणत्याही प्रकारचा पुरावासुध्दा नसतो. मग अपोआपच या लोकांची हिम्मत वाढते. ब-याचदा या गोष्टी कोणत्यातरी दबावाखाली चालू होतात. मानसिक किंवा आर्थिक. कधीकधी तर निव्वळ विद्यापीठावर किंवा वरिष्ठांवर सूड म्हणून हे गैरप्रकार चालू होतात. सध्याचं युगच असं आहे की इथे प्रत्येकाला मोठं व्हायचं असतं आणि ते ही झटपट. मग यापेक्षा झटपट पैसा मिळवून देणारं साधन ते कोणते ?

सद्यपरिस्थितीत या गैरप्रकारकारांविरुध्द लढाई छेडल्यास ती बुध्दिबळाच्या सामन्यासारखीच रंगतदार होणार आहे. कारण गैरप्रकारकारांनी तंत्रज्ञानाच्या वापरात बाजी मारुन खूप मोठी आघाडी घेतलेली आहे आणि आम्ही मात्र अजून यांच्याविरुध्द लढाइ देण्यासाठी अजून मानसिकताच बनवत आहोत.

<u>उपाययोजना कोणत्या ?</u>

गेल्या काही वर्षात पुनर्मूल्यांकनात होणा-या घोटाळ्यांमध्ये वाढ झाली म्हणून काही विद्यापीठांनी पुनर्मूल्यांकनच बंद करुन टाकलं.पण हे काही समस्येचे समाधान नाही. समस्येचे उत्तम समाधान नैतिकतेमधून होउ शकते पण आता ती वेळ राहिलेली नाही. गैरप्रकार करणारी मंडळी खूपच हुशार झाली आहेत. त्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देणं आवश्यक बनले आहे त्यामुळे आता गरज आहे ती जरब बसवण्याची.एखादी व्यक्ति दोषी सापडल्यास तिला त्याने विद्यार्थ्यांकडून घेतलेल्या रकमेपेक्षा कित्येक पटींने जास्त दंड करणे , या विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे रद्दबातल ठरवून त्यांना नोकरीवरुन कमी करण्याची मागणी करणे, या संदर्भात नवा कायदा पास करुन घेउन प्रामाणिक विद्यार्थ्याच्या हिताचे रक्षण करणे खरं तर अत्यंत आवश्यक झाले आहे. (पण वेगळा कायदा पास करायचा म्हणजे माझा उभा जन्म बहुतेक मला त्याचीच वाट बघत बसायला लागेल).

सध्याची परिक्षापध्दति या सगळ्या गोष्टीला कारणीभूत आहे ही बाब कोणीच अमान्य करु शकणार नाही. त्यापेक्षा परंपरागत परिक्षापध्दतिला छेद देउन नवीन परिक्षाप्रणाली विकसित करणे हाच खरा उपाय आहे. माझा रोख नवीन संगणकीय कार्यक्रमांकडे खचितच नाही. कारण सगळ्या गैरप्रकारांचे मूळ त्यात लपले आहे.

माणूसकी, सोशिकता, प्रयोजन, कल्पनाविस्तार आणि सत्याचा शोध या सर्वांचा सुरेख संगम आणि मानव जमातीच्या अत्युच्च उद्दिष्टांकडे झालेल्या प्रवासाचा साक्षीदार म्हणजे विद्यापीठ ! जो पर्यंत विद्यापीठे आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडत असतात तो पर्यंत देशाचे भवितव्य सुखरुप असते. हे पंडित जवाहरलाल नेहरुंचे वाक्य फारच सूचक आहे. पण या वक्तव्याव्र आज गांभिर्याने विचार करायची गरज निर्माण झाली आहे.

<u>मयूर शरद जोशी</u>